# एम.बी.मोरे महीला महाविद्यालयात पार्लर कोर्सचे उद्घाटन

धाटाव - रोहा  येथील एम.बी.मोरे फाऊंडेशन संचलित कला वाणिज्य आणि विज्ञान महीला महाविद्यालयातील महीला सक्षमीकरण विभागाअंतर्गत आणि सुदर्शन केमिकल्स इंडस्ट्रिज लि. रोहा व कर्वे समाज संस्था पुणे तसेच वसुंधरा कौशल्य विकास या उदघाटन कार्यक्रमात वसुंधरा सामाजिक संस्थेच्या अध्यक्ष सौ. सुप्रिया पाशिलकर यांनी आजपासून सूरू होर्णा या महाविद्यालयातील ब्युटी पार्लर ट्रेनिंग च्या शॉर्ट टर्म कोर्स बददल  विद्यार्थिनींस माहिती दिली.

तसेच महीला महाविद्यालयात  भविष्यात असा पध्दतीचे महिलांना लघु उद्योग सुरू करण्यास सक्षम करू शकतील अश्या अनेक कोर्सबावत देखील माहिती दिली. आज एखाद्या विद्यार्थिनीस लघु उद्योग सुरू करण्यास सरकार कडून असलेल्या योजना आणि भांडवल उपलब्धी यांच्या विषयी माहीती दिली.

या कार्यक्रमात महीला महाविद्यालयाच्या तृतीय वर्ष कला वाणिज्य आणि विज्ञान वर्गाच्या सर्व विद्यार्थिनी उपस्थित होत्या. तसेच सुदर्शन केमिकल्स व कर्वे टिम मधील श्री. सुनिल साळुंखे श्री. नितेश जाधव कु. कल्पना केंजळे तसेच वसुंधरा कौशल्य विकास संस्थेच्या सौ.कविता कदम□सौ. सिया मॅडम तसेच महाविद्यालयाच्या प्राध्यापिका सौ. प्रतिमा भोईर प्राध्यापिका निकीता महाडिक प्राध्यापिका संज्योती पडवळ व प्राध्यापक दिपेश भगत उपस्थित होते.

